**जिल्हा व सत्र न्यायालय, नाशिक**
**जुने सीबीएस शेजारी, जुना आग्रा रोड, नाशिक. ४२२००२**
**फोन नं ०२५३- २५७८६९५ फॅक्स नं - ०२५३-२३१६६९७**
**ई-मेल - mahnasdc@mhstate.nic.in**

जा. क्र. वित्त/खरेदी समिती/४७५०/२०२६. दिनांक ०७ जुलै, २०२६.

## कोटेशन (दरपत्रक) मागविण्याबाबतची जाहीर नोटीस

मा. जिल्हा व सत्र न्यायालय, नाशिक व त्यांचे अधिपत्याखालील तालुका न्यायालयातील कार्यरत असलेले बेलिफ यांचेकरीता रेनकोटस व बॅग्स खरेदी करणेकामी मा. जिल्हा व सत्र न्यायालय, नाशिक यांचेकडुन अधिकृत उत्पादक, विक्रेते आणि पुरवठादारांकडून रेनकोट आणि बॅग्स पुरवठा करणेकामी सिलबंद पाकिटात कोटेशन (दरपत्रक) मागविण्यात येत आहेत.

**१) साहित्याचा तपशिल व आवश्यकता :-**

| अ. क्र. | साहित्याचे नांव | तपशिल / गुणवत्ता (Specification) | अंदाजित संख्या |
|---|---|---|---|
| १ | रेनकोट (Raincoat) | वॉटरप्रुफ, उत्तम दर्जाचे कापड, हुड (टोपीसह) (आकार XXL) | १०९ |
| २ | बॅग्स (Bags) | ३० लिटर ची वॉटरप्रुफ, उत्तम दर्जाचे कापड (उदा. ३ कप्पे असणारी) मजबूत झिप आणि सॅक | १०९ |

**३) कोटेशन (दरपत्रक) सादर करण्याची अंतिम तारीख :-**
दिनांक १० जुलै, २०२६ रोजी सायंकाळी ०५:०० वाजेपावेतो.

**२) कोटेशन (दरपत्रक) पाठविण्यासाठी पत्ता :-**
मा. प्रबंधक,
जिल्हा व सत्र न्यायालय, नाशिक,
नवीन इमारत, ६ वा मजला,
जिल्हा व सत्र न्यायालय, नाशिक आवार,
जुने सिबीएस जवळ, नाशिक, ता. जि. नाशिक.

**४) अटी व शर्ती :-**
**अ)** सर्व दर सर्व करांसह (GST जीएसटी सहित) व साहित्य कार्यालयात पोहोच असणे आवश्यक आहे.
**ब)** अधिकृत उत्पादक, विक्रेते आणि पुरवठादारांचे कोणत्याही न्यायालयात न्यायालयीन खटला प्रलंबित नसल्याचे व न्यायालयातील अधिकारी व कर्मचारी यांचेशी हितसंबंध नसल्याचे हमीपत्र.
**क)** कोटेशन असलेले पाकीट पूर्णपणे सिलबंद असावे आणि त्यावर स्पष्ट अक्षरात **''रेनकोट व बॅग्स खरेदीसाठी कोटेशन''** असे लिहिलेले असावे.
**ड)** पुरवठा करण्यात येणाऱ्या साहित्याचा नमुना (Sample) मागणी केल्यास सादर करावा लागेल.
**इ)** मुदतीनंतर आलेल्या कोटेशनचा विचार केला जाणार नाही.
**ई)** कोणतेही कारण न देता कोटेशन मंजूर किंवा नामंजूर करण्याचा अधिकार मा. जिल्हा व सत्र न्यायालय, नाशिक चे खरेदी समितीकडे राखीव राहिल.

**ठिकाण** :- नाशिक.
**दिनांक** :- ०७ जुलै, २०२६.

(सुजाता व्ही. देशमुख)
प्रभारी प्रबंधक
जिल्हा व सत्र न्यायालय, नाशिक